जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति



(Since 1969) www.jainjagruti.in

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
मो. : ८२६२०५६४८०, ☎ : ०२० – २४२१५५८३
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१
❖ संस्थापक ❖
स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया
संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
सहसंपादक : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५३ वे ❖ अंक १० वा ❖ जून २०२२ ❖ वीर संवत २५४८ ❖ विक्रम संवत २०७८

या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● जितो कनेक्ट – २०२२, पुणे | १५ |
| ● जागतिक आयुष्य परिषद – गुजरात | २४ |
| ● श्री. कांतीलालजी मुनोत – निगडी | २९ |
| ● माताजी सौ. कमलादेवी कर्नावट प्रतिष्ठान, पुणे | ३० |
| ● ओसवाल बंधू समाज, पुणे | ३१ |
| ● कव्हर तपशील | ३३ |
| ● अंतिम महागाथा : ३९ – देवानुप्रिय | ३५ |
| ● जिन शासन के चमकते हिरे | |
| ✻ विजय शेठ – विजया सेठानी | ४१ |
| ✻ श्री ढुंढण कुमार | ४२ |
| ✻ श्री रहनेमि | ४२ |
| ● जागृत विचार | ४३ |
| ● आत्मविश्वास एक मानसिक एवं आध्यात्मिक शक्ति | ४५ |
| ● संयुक्त परिवार | ४६ |
| ● चल अकेला – चल अकेला | ४७ |
| ● मोक्ष मार्ग के २१ कदम : गुरु भक्ती २ | ५७ |
| ● कडवे प्रवचन | ६२ |
| ● हास्य जागृति | ६३ |
| ● जीवन बोध : करेगा सो भरेगा | ६४ |
| ● रंगबिरंगी : | |
| ✻ रंग आइने के | ६६ |
| ✻ रंग झूठ के | ६७ |
| ● ऐसी हुई जब गुरु कृपा : खौलतो मत रह | ६९ |

● उत्सव काव्य ७१
● मिथ्यात्व : संसार का मूल ७४
● हुलकर्मी एवं भारी कर्मा ७९
● जैन ओसवाल बोर्डींग, नाशिक ८०
● सुक्ति से मुक्ति : दया ८१
● आदर्श विवाह संस्थान, पुणे ८३
● बेकार की बात ८४
● सूत्रकृतांग सूत्र : एक परिचय ८५
● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा ८८
● क्या आपको जेल पसन्द है ? ८९
● चार कथा ९१
● पुण्यवान वृध्द स्त्री ९२
● तीन मनोरथ ९३
● सुगम उपाय ९३
● विविध धार्मिक, सामाजिक बातम्या


**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

**या अंकाची किंमत ५० रुपये.**

- www.jainjagruti.in
- www.facebook.com/jainjagrutimagazine

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा.
- 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात - रोख/**Google Pay, M. 9822086997**/**AT PAR** चेक/पुणे चेकने/ **RTGS / Jain Jagruti Website** इत्यादी द्वारा पाठवावी

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**

**Bank : STATE BANK OF INDIA** **Branch : Market Yard, Pune 37.**

**Current A/c No. : 10521020146** **IFS Code : SBIN0006117**


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२-१३, पर्वती टॉवर्स, पुणे - ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, पुणे - ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक - एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

टिप : जैन जागृति अंकात प्रकाशित लेख, बातम्या, जाहिरातीचे सर्वाधिकार सुरक्षीत आहेत.

# जितो कनेक्ट – २०२२, पुणे
## पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी हस्ते उद्‍घाटन
**❊ भव्य आयोजन ❊ ८१ चर्चासत्रात तज्ञांचे मार्गदर्शन**

**❊ ट्रेड फेअर ❊ जैन पॅव्हेलीयन ❊ मनोरंजन**

पुणे : जितो कनेक्ट २०२२ आंतरराष्ट्रीय परिषद पुणे येथे ६, ७ व ८ मे २०२२ रोजी अतिभव्य कार्यक्रमात संपन्न झाले. या परिषदेचे उद्‍घाटन पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन झाले. केंद्रीय रस्ते वाहतुक आणि परिवहन मंत्री नितीनजी गडकरी, आमदार माधुरीजी मिसाळ, उद्योजक प्रकाशजी धारिवाल, नरेंद्रजी बलदोटा, विनोदजी मांडोत, 'जीतो ॲपेक्स'चे चेअरमन गणपतराजजी चौधरी, व्हाइस चेअरमन विजयजी भंडारी, 'जितो ॲपेक्स'चे अध्यक्ष सुरेशजी मुथा, 'जीतो पुणे'चे अध्यक्ष ओमप्रकाशजी रांका, 'जीतो कनेक्ट'चे समन्वयक राजेशजी सांकला आदी या वेळी उपस्थित होते.

''देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना विदेशी वस्तू वापरण्याच्या गुलामगिरी मानसिकतेतून नागरिकांनी आता बाहेर पडले पाहिजे. दर्जेदार स्वदेशी वस्तूंचे उत्पादन हा त्यावरचा पर्याय आहे. त्यासाठी आत्मनिर्भर भारत हा शाश्वत मार्ग आहे.'' असा विश्वास पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी व्यक्त केला.

कुटुंबातील सगळ्यांनी एकत्र बसा. सकाळपासून आपल्या दैनंदिन वापरात किती आणि कोणत्या परदेशी बनावटीच्या वस्तू वापरतो याची यादी करा. यापैकी कोणत्या वस्तूंना आपण स्वदेशी पर्यायी वस्तू देऊ शकतो, याची निर्मिती करण्याच्या दृष्टीने विचार करण्याचे आवाहन मोदी यांनी केले.

'टुगेदर... टुवर्ड्स टुमॉरो' ही 'जीतो' परिषदेची संकल्पना हाच वेगाने विकासाचा मंत्र असल्याचे मोदी यांनी स्पष्ट केले. विकास सर्वव्यापी असावा. या परिषदेमध्ये वर्तमान आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी उपाय शोधण्याचा प्रयत्न करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांनी सांगितले की, ''देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी दिलेला स्वदेशी वस्तू वापरण्याचा मंत्र प्रत्यक्ष आणला पाहिजे. एकविसावे शतक भारताचे असून आपण त्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न करण्याची गरज आहे.''

जगात दहशतवाद पसरतो आहे. एकमेकांना संपविण्याची भाषा केली जात आहे. त्यामुळे जैन धर्माच्या पंचशील तत्त्वांचे अनुकरण करण्याची गरज आहे. याची सुरुवात स्वत:पासून केली पाहिजे. ●

## प्राईड ऑफ पुणे पुरस्कार वितरण

''भगवान महावीर यांनी दिलेले शांती व क्षमा हे तत्त्वज्ञान फक्त देशातच नाही, तर विदेशात सुध्दा स्वीकारले गेले याचा गर्व आहे. देशात जेव्हा संकट निर्माण होते, तेव्हा जैन समुदाय समाजाच्या मदतीसाठी धावून जातो. देशासाठी जैन समाजाने केलेले काम आम्ही कधीही विसरु शकत नाही,'' असे गौरवोद्‍गार राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री शरदजी पवार यांनी काढले. श्री. शरद पवार यांच्या हस्ते 'प्राईड ऑफ पुणे' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या वेळी पवार बोलत होते.

पवार म्हणाले, ''देशात माझे अनेक जैन मित्र आहेत. त्यांनी देशासाठी मोठे काम केले आहे. यामध्ये भवरलालजी जैन यांनी शेतीसाठी नवे तंत्रज्ञान आणले. पूर्वी बिर्ला, टाटा यांचेच देशात नाव घेतले जात होते. आता माझे मित्र गौतम अदानी हे देशाला पुढे घेऊन जात आहेत. विमानसेवा, आयात-निर्यात आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रात काम करत आहेत.''

जैन समाजातील नवी पिढी प्रशासकीय सेवेत, माहिती तंत्रज्ञानासह विविध क्षेत्रात मोठ्या पदावर काम करत आहेत. पण त्याच सोबत देशाच्या प्रगतीसाठी व्यापार-व्यवसायाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही, याकडेही पवार यांनी लक्ष वेधले.

उद्योजक श्री. विजयजी भंडारी, सुधीरजी मेहता, युवा उद्योजक अतुलजी चोरडिया, सूर्यदत्ता इन्स्टिट्युटचे संस्थापक संजयजी चोरडिया, सामाजिक कार्यकर्त्या विमलजी बाफना, 'सरहद्द'चे संजयजी नहार, ॲथलेटिक्स खेळाडू प्रितम तातेड यांना प्राईड ऑफ पुणे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ●

## फॅमिली ऑफिस समिट

फॅमिली ऑफिस समिटमध्ये मेफेझेलिया फॅमिली ऑफिसचे प्रमुख अमोलजी साठे, एलएनबी ग्रुपच्या फॅमिली ऑफिसचे संचालक अमितजी मेहता, आरएएवाय ग्लोबल इन्व्हेस्टमेंटचे संस्थापक अमितजी पटनी सहभागी झाले होते. वॉटरफिल्ड ॲडव्हायझर्सचे कार्यकारी संचालक विवेकजी राजारामन यांनी चर्चा प्रवर्तक म्हणून जबाबदारी पार पडली. फॅमिली ऑफिसेस कंपन्यांची आदर्श कार्यप्रणाली, तसेच त्यांच्याकडे असलेल्या उद्योगांच्या वित्ताची गुंतवणूक आणि बड्या उद्योजक कुटुंबांनी आपले वारसदार निवडताना घ्यावयाची काळजी अशा विविध विषयांवर या वेळी चर्चा झाली.

खासगी संपत्तीच्या व्यवस्थापनासाठी सल्लागार म्हणून कार्य करणारी संस्था म्हणजे फॅमिली ऑफिस होय, ज्या अति उच्च उत्पन्न गटातील उद्योजक कुटुंबांना सल्ला आणि सेवा देतात. श्रीमंती कुटुंबांचे आर्थिक व्यवस्थापन आणि गुंतवणुकीच्या संदर्भात हे ऑफिसेस काम करतात. ●

## नकारात्मक मानसिकतेला दूर करा

बडा करना नहीं, बडा सोचना मुश्कील है... कुछ पाने के लिए कुछ खोना नहीं पडता... कुछ करना पडता है, असे सांगत त्यांनी नकारात्मक मानसिकतेला दूर लोटण्याचा सल्ला 'बडा बिझनेस'चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मार्गदर्शक विवेकजी बिंद्रा यांनी दिला.

अडचणींना तलाक आणि संधीला कबूल म्हणण्यास त्यांनी शिकवले. आपल्या लक्ष्यावर लक्ष केंद्रित केल्यास अडचणी दूर पळून जातात असा विश्वासही त्यांनी दिला. ग्राहकांचा कल लक्षात घेऊन उत्पादन तयार करा. अनेकदा लोकांना जाणवणाऱ्या अडचणीत उद्योगाची वा व्यवसायाची संधी असल्याचेही बिंद्रा यांनी सुचविले.

**व्यवसायाचा कानमंत्र**

✻ ग्राहकांचे वर्तन समजू न शकल्याने अनेक स्टार्टअप कंपन्या बंद पडल्या.

✻ ग्राहक सोडून जाऊ नये असेच उत्पादन आणा.

✻ तांत्रिक, व्यवस्थापन आणि ग्राहकजोड कौशल्य तुम्हाला तारु शकते.

✻ ग्राहकांना आपल्या उत्पादनातून 'अरे वाह....' असा अनुभव आला पाहिजे.

✻ लोकांना अडचण कशाची होतय याचे भान ठेवून नवे उत्पादन बाजारात आणा. ●

## प्रत्येक तंत्रज्ञानाला बदलाची गरज

''भारताला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल, तर आपण वाढत्या तंत्रज्ञानासह जागतिक

स्तरावर पावले टाकली पाहिजेत. नवीन गुगल, नवीन ॲमेझॉन बनविण्याची वेळ गेली आहे. ती ९०च्या दशकातच तयार झाली आहे. प्रत्येक तंत्रज्ञानाला बदलाची गरज आहे.'' असे झोस्टल व झो-वर्ल्डचे संस्थापक धरमवीरसिंग चौहान यांनी सांगितले.

'एनएफटी आणि मेटाव्हर्स सिम्युलेशन' विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी मेटाव्हर्स मधील संधी आणि एखादी व्यक्ती त्यात कशी प्रवेश करु शकते हे स्पष्ट केले. दिवसेंदिवस लोक डिजिटल जगात अधिकाधिक येत असल्याचे नमूद केले. •

## फ्रँचाईज व्यवसाय

फ्रँचाईज व्यवसाय कसा चालवावा ? त्यातील फायदे तोटे काय आहेत ? यासह कोणत्याही व्यवसायाच्या स्थापनेपासून त्यांच्या शेवटपर्यंतचा प्रवास कसा होतो याची माहिती फ्रँचाईज व इतर व्यवसायांत यशस्वी झालेल्या व्यावसायिकांनी दिली.

खुलजा सिम सिम (वेलकम टु अनलिमिटेड बिझनेस अपॉच्युनिटीज) या विषयावर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. 'पी. ओस्तवाल ग्रुप'चे पारसजी ओस्तवाल, 'सुहाना'च्या दिग्गी दोराबजी, राजेशजी मेहता, निखिलजी बोथरा, अमोलजी रामटेके, अंकितजी दोशी यांनी मार्गदर्शन केले. ओस्तवाल म्हणाले, ''फ्रँचाईज व्यवसाय करायचा असेल, तर किमान पाच दुकाने सुरु करा. फ्रँचाईजमध्ये काम केले तर अशी सिस्टीम सेट करायची की प्रत्येक वेळी आपल्याला शॉपमध्ये जावे लागणार नाही.'' दोराबजी यांनी सुहानाचा प्रवास मांडला. •

## गुंतवणूक करताना वैविध्य आवश्यक

गुंतवणूक करताना त्यात वैविध्य ठेवणे गरजेचे आहे. एकाच प्रकारात गुंतवणूक करणे जोखमीचे असते, असा सल्ला आर्थिक तज्ज्ञांनी गुंतवणूक विषयक चर्चा सत्रात दिला.

गुंतवणूक कुठे करायची रिअल इस्टेट, स्टार्टअप की इतर मालमत्ता ? या विषयावर आयोजित केलेल्या चर्चासत्रात फायनान्शिअल सर्व्हिसेसचे व्यवस्थापकीय संचालक मोतीलाल ओसवाल, रेअर एंटरप्राईजेसचे (राकेश झुनझुनवाला) उत्पल शेठ, व्ही कॅट्सचे सहसंस्थापक डॉ. अपूर्व रंजन शर्मा, एव्हरस्टोन कॅपिटलचे उपाध्यक्ष धनपालजी झवेरी सहभागी झाले होते. शेअर बाजारातील गुंतवणूकीबाबत मार्गदर्शन करताना मोतीलालजी ओसवाल म्हणाले, ''एकाच शेअरमध्ये मोठी गुंतवणूक न करता अनेक शेअरमध्ये विभागून गुंतवणे योग्य ठरते. तसेच शेअर शिवाय मुच्युअल फंडसारख्या वेगवेगळ्या पर्यायामध्ये गुंतवणूक करणे ही आवश्यक आहे.'' क्रिप्टो करन्सी हे डिजिटल चलन आहे. त्याच्या दीर्घकालीन वर्तनाचा अंदाज लावला जाऊ शकत नाही. मात्र त्याचे निरीक्षण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. अपूर्व रंजन शर्मा यांनी स्टार्ट अप मधील गुंतवणूक फायदेशीर ठरत असल्याने त्यात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. ''गुंतवणूक करताना नेहमी आशावादी असावे. किती पैसा गुंतवणूकीसाठी आहे त्याची खात्री करावी.'' असा सल्ला उत्पल शेठ यांनी दिला. •

## व्यवसाय वृध्दीसाठी कौशल्ये गरजेची

''व्यवसायाची वृध्दी होण्यासाठी केवळ पैसा लागत नाही, तर स्वत:ला झोकून देण्याची वृत्ती असावी लागते. यासाठी नवीन कौशल्ये आत्मसात करणे, सर्वच कामे स्वत: न करता कर्मचाऱ्यांकडून काम करवून घेण्याची कला अवगत होणे आवश्यक आहे. व्यवसाय आपल्या शिवाय देखील वृध्दी कसा करेल याचा विचार केला तरच व्यवसाय वाढीसाठी

पूरक वातावरण तयार होते,'' असे मत बिझनेस कोच राहुल जैन यांनी डबल युवर प्रॉफिट परिसंवादात व्यक्त केले.

व्यवसाय वाढीसाठी अनेक वर्षाचे उद्दिष्ट ठेवा, सर्वच गोष्टी मनात न ठेवता त्या कागदावर लिहून काढा. त्याचे अनुसरण करा. तसेच सोशल मीडियावर वेळ घालवण्यापेक्षा नवनवीन गोष्टी शिका. सध्या व्यावसायिकांना डिस्काउंट, क्रेडिट, स्पर्धा, मार्केट मधील मंदी या समस्या जाणवतात. मात्र या समस्या नाही तर उद्योगवाढी साठी विचार करण्यासाठी वेळ आहे. वेळ न मिळणे ही समस्या आहे. विक्री एक ही समस्या नाही तर ते ज्ञान आहे, असा सल्लाही यावेळी राहुल जैन यांनी उपस्थित व्यावसायिकांना दिला. •

## महिलांना अशक्य असे काही नाही

महिलांनी मनात आणले तर त्या काहीही करु शकतात, असा ठाम विश्वास आज आर्थिक क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या उद्योजिकांनी व्यक्त केले. महिलांच्या पहचान या सत्रात मुंबई शेअर बाजाराच्या माजी अध्यक्ष दीना मेहता, फॅशन डिझायनर निवेदिता साबू, लक्झरी ज्वेलरी डिझायनर पूनम सोनी, रेस्टॉरंट व्यावसायिक सोनल बरमेचा आणि सुपर बॉटम्स कंपनीच्या पल्लवी उटगी सहभागी झाल्या होत्या.

देशातील सर्वात मोठ्या शेअर बाजारापैकी एक असलेल्या मुंबई शेअर बाजाराच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळणाऱ्या, गेली तीस वर्षे शेअर व्यवसायात कार्यरत असलेल्या दीना मेहता यांनी शेअर बाजार आणि जीवनाचे नाते उलगडले. चढ-उतार हा शेअर बाजाराचा स्थायीभाव आहे. तसाच तो आयुष्याचाही. ही नकारात्मक बाब नाही तर ती संधी आहे. हे लक्षात आले की पैसा कमावता येतो. जीवनातले चढ-उतारही यशस्वीपणे पार करता येतात. यासाठी स्वयंशिस्त महत्त्वाची ठरते. महिला उत्तम संतुलन सांभाळू शकतात, त्यामुळे या क्षेत्रातही त्या सहज यशस्वी होऊ शकतात, असे मत मेहता यांनी व्यक्त केले.

व्यवसाय करताना महिला म्हणून आव्हाने येतात मात्र हार न मानता त्याचा सामना केला की सर्वांचा दृष्टीकोन बदलतो, हे महिलांनी लक्षात ठेवले पाहिजे असे पल्लवी उटगी म्हणाल्या. तुमच्याकडे आत्मविश्वास असेल, तुम्ही खंबीर असाल तर महिला म्हणून कोणीही तुम्हाला मागे खेचू शकत नाही, असे मत निवेदीता साबू यांनी व्यक्त केले.

कोणत्याही वयात करिअर घडवता येते. वय हा तुमच्या प्रगतीत अडथळा ठरु शकत नाही, असे सोनल बरमेचा म्हणाल्या. •

## जीवन सुख, दु:खाचा चढ-उतार

''जीवनात मोठी स्वप्ने पाहिली, तरच आपण प्रगती करु शकतो. कामावर लक्ष्य देवून अथक प्रयत्न केले, तर प्रगती होऊ शकते. रात्र स्वप्न पाहण्यासाठी असते आणि दिवस स्वप्न पूर्ण करण्यासाठी असतात. दुसऱ्याच्या जीवनावर लक्ष्य केंद्रित करण्यापेक्षा स्वत:च्या जीवनावर लक्ष्य केंद्रित करणे आवश्यक आहे. जीवनात दररोज अनेक अडचणी सर्वांना येतात आणि सुख, दु:ख यांचा चढ-उतार कायम सुरु असतो. मात्र, त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'' असे मत प्रेरणादायी वक्ते गौर गोपाल दास यांनी व्यक्त केले.

जीवनात मृत्यू एकदा मिळतो, पण जीवन हे दररोज नव्याने मिळत असते. समाधान नसेल, तर जीवनात आनंद मिळू शकत नाही. आलिशान घरापेक्षा घराच्या आतील नाती सुख देतात. महागडा मोबाईल सुख नाही देत, तर त्यावर साधला जाणारा संवाद समाधान देतो. खूष राहण्याची जबाबदारी कोणा दुसऱ्याची नाही, तर ती स्वत:ची आहे.

※ स्वत:जवळ असलेल्या सुख-सोयींमध्ये आनंद शोधा.

※ करिअर काळजीपूर्वक निवडा.

※ यशाचे शिखर चढताना परिवार आणि मित्रांना दुखवू नका.

※ कामाचे समाधान, मदत करणे, एकत्रित काम ही यशाची गुरुकिल्ली.

※ नातेसंबंध, आरोग्य, मित्र-नातेवाईकांना न विसरता सुखाने आयुष्य जगा.

※ स्वत:च्या विकासासाठी जिद्दीने प्रयत्न करा व आत्मविश्वास बाळगा. •

## ट्रॅडिशनल वर्सेस डिसरप्टीव्ह बिझनेस

सातत्याने नवे काही करणे हा उद्योगांचा स्थायीभाव आहे. नवीन कल्पना घेऊन येणारे नवउद्योजक मोठी कलाटणी देत आहे. तंत्रज्ञान स्नेही असलेले हे नवे उद्योग अधिक ग्राहक केंद्रित आहे, असे मत 'जीतो कनेक्ट'मध्ये आयोजित 'ट्रॅडिशनल वर्सेस डिसरप्टीव्ह बिझनेस' चर्चासत्रात तज्ज्ञांनी व्यक्त केले.

डॉ. रेड्डीज लॅबरोटरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपकजी सप्रा, पिनॅकल इंडस्ट्रीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीरजी मेहता, फार्मइझीचे सहसंस्थापक सिध्दार्थजी शहा, चलोचे सहसंस्थापक मोहितजी दुबे हे या चर्चासत्रात सहभागी झाले होते. भारतात प्रचंड लोकसंख्या आहे आणि त्या सगळ्यापर्यंत पोहोचण्यासाठी एक मोठी नेटवर्किंग सिस्टिम देखील उभी राहिली आहे. फक्त तुम्ही लोकापर्यंत कसे पोहोचतात यावर तुमच्या व्यवसायाचे यशापयश अवलंबून आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात तुम्ही कुठलीही नवीन आणि भन्नाट अशी बिझनेस कल्पना घेऊन आलात, तर त्यासाठी भारत हा देश नंदनवनच आहे, असे मतही तज्ज्ञांनी व्यक्त केले. 'ट्रॅडिशनल वर्सस डिसरप्टीव्ह बिझनेस' असा कुठलाही फरक नसून 'बिझनेस इस ओन्ली बिझनेस' अशीच आहे. असेही त्यांनी स्पष्ट केले.

दर पाच वर्षांनी तुमची कुठलीही नवी कल्पना जुनी होते, त्यामुळे मार्केटमध्ये आलेली नवीन कल्पना तुम्ही समजून घ्या, अन्यथा त्यापेक्षा उत्तम अशी नवीन कल्पना घेऊन या, तरच तुम्ही तुमच्या क्षेत्रात टिकून राहाल. सोबतच कुठल्याही उद्योगाच्या सुरुवातीला त्याच्या ग्राउंडवर काय मागणी आहे, हे जरुर तपासा त्यातून तुमचा उद्योग बहरत जाईल. •

## गरजेचे रुपांतर संधीत करा

''गरज ओळखा, अडचण सोडवा, त्यातून तुम्हाला तुमच्या बिझनेसचे मॉडेल मिळेल,'' असा सल्ला 'रिलायन्स जिओ इन्फोकॉम'चे प्रमुख आर्थिक अधिकारी (सीएफओ) रजनीश जैन यांनी दिला.

'जीतो कनेक्ट' परिषदेत 'इंडियाज ग्रोथ स्टोरी' कार्यक्रमात ते बोलत होते. 'जिओ' ने भारतात कोविड काळात कशी आणि कोणत्या स्वरुपात मदत केली या सगळ्यांची आकडेवारी देत भविष्यात कोणत्या उद्योगात नव उद्योजकांनी गुंतवणूक करावी, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

जैन म्हणाले, ''जगातील शेतीचे उत्पन्न शून्य झाले आणि फक्त भारताने दुप्पटीने शेतीतील उत्पन्न वाढवले, तर सर्व जगाला आपण अन्नाचा पुरवठा करु शकू एवढी प्रचंड ताकद आपली आहे. त्यामुळे कृषीक्षेत्राकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. तसेच प्रत्येक कामात तुम्हाला यश मिळेल असे नाही. काही कामात अपयश देखील येऊ शकते. पण त्यातून खचून जाऊ नका. यश तुम्हाला फक्त नाव देते, पण अपयश तुम्हाला अनुभव देऊन जाते.'' •

## ई-कॉमर्सला भविष्यात पर्याय नाही

''तुमच्या एखाद्या छोटेखानी उद्योगाचे 'ऑनलाईन प्रेझेंस' दाखवायचा असेल, तर कमी खर्चात उपलब्ध असलेल्या 'नो-कोड'चा वापर करुन तुम्ही तुमची वेबसाईट बनवू शकता. तसेच 'पेमेंट गेटवे' बनवू शकता. यातून तुमचा 'ऑनलाईन प्रेझेंस' देखील दिसेल. त्यामुळे 'नो-कोड'ला आवर्जून प्राधान्य द्या. भविष्यात ई-कॉमर्सला दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने त्याकडे दुर्लक्ष करु नका,'' असा सल्ला 'रेझर पे'च्या प्रॉडक्ट मॅनेजर अदिती कोठारी यांनी दिला. •

## चर्चासत्रात तज्ज्ञांचे मार्गदर्शन

'जीतो प्रोफेशनल फोरम'द्वारे 'व्यवसायाला प्रतिकूल परिस्थितीतून बाहेर कसे काढावे', या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. यात पोकर्ण लिमिटेडचे संस्थापक गौतमचंदजी जैन, 'ब्रेस्कोन'चे संस्थापक निर्मलजी गंगवाल, 'रिध्दी-सिद्धी ग्रुप बायोल्स'चे संस्थापक गणपतराजजी चौधरी आणि सुयोग ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक शिवशंकरजी लातुरे आदींनी व्यावसायिकांना मार्गदर्शन केले.

चौधरी म्हणाले, ''आपण विचार करत असलेल्या गोष्टी जे आयुष्यात प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करतात, तेच इतिहास रचतात. माझ्या आयुष्यात खूप वेगवेगळी वळणे आली. मला अनेकदा नकारांचा सामना करावा लागला होता, परंतु मला मिळालेले नकार मी नेहमीच सकारत्मकतेने घेतले. व्यवसायात केव्हाच भावनिक संबंध तयार करु नका. कारण व्यवसाय हा व्यवसाय असतो. तसेच नेहमी तुमच्या आतील आवाज ऐका आणि पुढे चालत राहा.''

लातुरे म्हणाले, ''व्यवसाय करताना फक्त आपला फायदा किती होतोय याकडे लक्ष देऊ नका, तर आपल्या उलाढालीवर देखील लक्ष द्या.''

निर्मल गंगवाल म्हणाले, मी उपाय शोधण्यात खूप माहीर आहे. अडचणींमध्ये उपाय शोधणारा मी एक कलाकार आहे. तुम्ही जे काय करता त्यावर विश्वास ठेवा. व्यवसायामध्ये येणारी प्रतिकूल परिस्थिती ही रस्त्याचा शेवट नसून ते केवळ एक वळण असते जे आपल्याला पार करावे लागते. व्यवसाय जेव्हा प्रतिकूल परिस्थितीमध्ये असेल तेव्हा प्रथम नेमकी अडचण कोठे आहे ते शोधण्याचा प्रयत्न करा.

कोणताही व्यवसाय करताना आपले लोकांशी असलेले संबंध खूप महत्त्वाचे असतात. यामुळे लोकांसोबत संबंध तयार करत रहा. तसेच नेहमी मोठा व्यवसाय करण्याचा विचार करा असे गौतमचंदजी जैन यांनी सांगितले. •

## जैन धर्मात विज्ञान व अध्यात्माचा उत्तम संग

उत्तम आरोग्यासाठी सकारात्मक विचार, योग्य आहार, पुरेशी झोप, नियमित व्यायाम या गोष्टी महत्त्वाच्या असतात. भावनिक ताण हेच आजारांचे मूळ आहे. जैन धर्मात सांगितलेली जीवनशैलीची सूत्रे औषधांचे काम करतात. त्यामुळे जैन धर्म हा केवळ आध्यात्मिक मार्ग नाही, तर विज्ञान आणि विवेकाचा संगम आहे, असे मत प्रसिध्द लाइफ स्टाईल कोच ल्युक कौटीन्हो यांनी व्यक्त केले.

ल्युक कौटीन्हो म्हणाले, जैन धर्मात उत्तम आरोग्यासाठी अनेक वैज्ञानिक सूत्रे सांगितली आहेत. त्याचे पालन केले तर निश्चित उत्तम आरोग्य लाभेल. सूर्यास्त ते सूर्योदय उपवास करणे, ध्यानधारणा करणे हे मानसिक स्वास्थ्यासाठी चांगले आहे.

आपल्या आहारात ९५ टक्के नैसर्गिक अन्न पाहिजे. जंक फूडच्या अतिसेवनाने अनेक मानसिक आणि शारीरिक आजार उद्भवतात.

आपल्या आजूबाजूला देखील अनेक नकारात्मक विचार असतात. त्याचा आपल्यावर देखील परिणाम होतो. त्यामुळे तुम्ही नकारात्मक विचार सकारात्मकते मध्ये कसे बदलता हे महत्त्वाचे आहे. ज्या गोष्टी बदलू शकत नाही त्याचा ताण घेऊ नका. त्याचा स्वीकार करा. •

## व्यवसाय वृध्दीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर भर द्या

डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन ऑफ बिझनेस सध्या वाढतो आहे आणि त्यामध्ये खूप संधी उपलब्ध होत आहेत. व्यवसाय वाढवायचा असेल तर डिजिटल तंत्रज्ञानावर भर दिला पाहिजे. आजच्या जीवनात तो किती महत्त्वाचा आहे याचे महत्त्व 'ऑनवर्ड टेक्नॉलॉजी'चे फौंडर हरीशजी मेहता यांनी सांगितले.

'डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन ऑफ बिझनेस' यावरील परिसंवादाच्या निमित्ताने हरीशजी मेहता लिखित 'इंडियाज रिव्होल्युशन मॅवरिक इफेक्ट'' या पुस्तकाचे यावेळी प्रकाशन केले. •

## 'जैन पॅव्हेलियन' सर्वांचे आकर्षण

जीतो कनेक्ट-२०२२ मध्ये 'जैन पॅव्हेलियन' येणाऱ्या प्रत्येकाचे आकर्षण ठरला. यामध्ये जैन धर्माच्या तीर्थंकरांच्या १८० मूर्ती ठेवण्यात आल्या होत्या.

मनुष्यगती, नरकगती, देवगती आणि स्वर्गगती याचे चित्ररुप प्रदर्शन देखील भरविण्यात आले आहे. लेझर शो द्वारा जैन धर्माची तत्त्वे सांगणारी फिल्म दाखवण्यात येत होती •

## जीतो कनेक्ट ट्रेड फेअर

जीतो कनेक्ट-२०२२ आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून शिक्षणापासून विविध प्रकारच्या उद्योगांचा मिलाफ येथे झाले आहे. ट्रेड फेअर आयोजित करण्यात आले होते. व्यवसाय ते व्यवसाय (बी टू बी), गृह, ऑटोमोबाईल, ऊर्जा, उच्च माध्यमिक, अभियांत्रिकी, रोबोटिक्स, अंतराळशास्त्र, बँकिंग, विमा, बिझनेस मॅनेजमेंट अशा विविध विषयांवर प्रकाश टाकणारे आणि ज्ञानात भर घालणारे स्टॉल्स आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहेत. कपडे, ज्वेलरी, फूड अॅटम इ. अनेक स्टॉल्स होते. •

## युवकाची लक्षणीय उपस्थिती

जितो कनेक्ट २०२२ चे भव्य आयोजन करण्यात आले. याला पुणे, महाराष्ट्र, भारत व परदेशातून लोकांनी हजेरी लावली. युवकांची कार्यक्रम आयोजण्यात व सर्व कार्यक्रमात सहभागी घेण्याची संख्या लक्षणीय होती. जितो कनेक्ट उत्साहात यशस्वीपणे संपन्न झाले. •


महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा
सर्वांत खात्रीशीर, सर्वांत सोपा व सर्वांत स्वस्त मार्ग...
जैन जागृति - जाहिराती साठी संपर्क करा.

## कव्हर तपशील - जून २०२२

❖ **जितो कनेक्ट २०२२, पुणे**

जितो कनेक्ट २०२२ ही आंतरराष्ट्रीय परिषद, पुणे येथे दि. ६, ७ व ८ मे २०२२ रोजी संपन्न झाली काही क्षणचित्रे.

**फोटो १ –** पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन या परिषदेचे उद्‌घाटन झाले.

**फोटो २ –** उद्‌घाटन प्रसंगी केंद्रीय रस्ते वाहतुक आणि परिवहन मंत्री श्री. नितीनजी गडकरी उपस्थित होते. त्यांचा सन्मान करताना जितो अॅपेक्सचे चेअरमन श्री. गणपतराजजी चौधरी, व्हाईस चेअरमन श्री. विजयजी भंडारी, जितो पुणेचे अध्यक्ष श्री. ओमप्रकाशजी राका, समन्वयक श्री. राजेशजी साकला, आमदार माधुरीताई मिसाळ, उद्योजक श्री. प्रकाशजी धारिवाल, उद्योजक श्री. विशालजी चोरडिया, श्री. इंदरजी छाजेड इ. मान्यवर

**फोटो ३ –** जितो कनेक्टचे मुख्य प्रायोजक श्री. विनोदजी बाबुलालजी मांडोत व मांडोत परिवारा तर्फे जितो कनेक्टच्या भव्य आयोजनाचे उद्‌घाटन करण्यात आले. सोबत जितोचे सर्व पदाधिकारी.

**फोटो ४ –** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शरदजी पवार यांच्या हस्ते 'प्राईड ऑफ पुणे' पुरस्काराचे वितरण करण्यात आले. उद्योजक श्री. विजयजी भंडारी, युवा उद्योजक श्री. अतुलजी चोरडिया, सूर्यदत्ता इन्स्टिट्युटचे श्री. संजयजी चोरडिया, सरहद संस्थेचे श्री. संजयजी नहार, श्री. सुधीरजी मेहता, अॅथलेटिक्स श्री. प्रितम तातेड, सामाजिक कार्यकर्त्या सौ. विमलजी बाफना यांची 'प्राईड ऑफ पुणे' पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. सोबत जितोचे पदाधिकारी.

**फोटो ५ –** हॉल १ हॉलमध्ये प्रेरणादायी वक्ते गौर गोपालदास यांनी मार्गदर्शन केले.

**फोटो ६ –** प्रसिध्द लाईफ स्टाईल कोच ल्युक कौटिल्ये यांचा सन्मान करताना जितो महिला अध्यक्ष सौ. खुशाली चोरडिया, सेक्रेटरी सौ. लखिशा मरलेचा, सौ. दिना धारिवाल, सौ. लतिका साकला, सौ. संगीता ललवाणी, सौ. वैशाली छाजेड इ. मान्यवर.

**फोटो ७ –** जितो कनेक्ट २०२२ मध्ये भव्य ''जैन पॅव्हेलियन'' उभारण्यात आले होते.

❖ **श्री. नरेंद्रजी मोदी सोबत श्री. आनंदजी चोरडिया**

गांधीनगर, गुजरात येथे जागतिक आयुष गुंतवणूक आणि अभिनवता परिषद २०२२ संपन्न झाली. या परिषद मध्ये दि इको फॅक्टरी फाऊंडेशन (टीईएफएफ) चे प्रदर्शन आयोजित केले होते. यावेळी दी इको फॅक्टरी फाऊंडेशनचे संस्थापक श्री. आनंदजी राजकुमारजी चोरडिया यांची पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्याबरोबर चर्चा झाली.

❖ **श्री. कांतीलालजी मुनोत – समाजभूषण**

निगडी, पुणे येथील उद्योजक श्री. कांतीलालजी मुनोत यांचा ८७ वा वाढदिवस, सुवर्ण शिडी व 'कृतार्थ मी' आत्मचरित्र पुस्तकाचे प्रकाशन इ. कार्यक्रम १ मे रोजी संपन्न झाले. यावेळी पिंपरी-चिंचवड जैन महासंघा तर्फे श्री. कांतीलालजी मुनोत यांना 'समाजभूषण' पदवीने गौरवण्यात आले. यांचा सन्मान करताना श्री. नितीनजी बेदमुथा, प्रा. अशोकजी पगारिया, श्री. सुभाषजी ललवाणी, श्री. मोहनशेठ संचेती, डॉ. भळगट, श्री. सुरेशजी गादिया, श्री. राजेंद्रजी मुनोत इ. मान्यवर.

❖ **माताजी सौ. कमलादेवी कर्नावट प्रतिष्ठान, पुणे**

माताजी सौ. कमलादेवी प्रकाशचंदजी कर्नावट यांच्या २५ एप्रिल रोजी ७१ व्या वाढदिवस निमित्त पुणे येथे ७ सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आदिनाथ स्थानकात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी माताजी सौ. कमलादेवी सोबत श्री. प्रकाशचंदजी कर्नावट, श्री. श्रेणीकजी कर्नावट व कर्नावट परिवार. •